**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५६ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८६** **दिनांक – ०६/०८/२०२५**

**विभाग – विद्युत विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मंजुर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा कामाचे दर निश्चित करणेबाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार मा. शासनाने दिनांक ०२/१२/२०२० रोजीचे अधिसुचनेनुसार एकत्रीकृत बांधकाम विकास नियत्रंण व प्रोत्साह नियमावली मंजुर केली असुन ती दिनांक ०२/१२/२०२० पासुन लागु केलीली आहे. सदर नियमावली तरतुदीनुसार रेखांकन अंतर्गत सुधारणा मध्ये दिवाबत्ती चे कामे स्वत : जमिन मालक अथवा विकासकाने करणे बंधनकारक आहे. सन २०२५ -२०२६ या आर्थिक मजुंर रेखांकनातील अंर्तगत सुधारणा कामाचे दर निश्चित करणेबाबत पत्र नगररचना विभागाकडुन विद्युत विभागाकडे प्राप्त झाले आहे

विद्युत विभाग अहिल्यानगर महानगरपलिका यांचे कडून विकासकांना देण्यात येणा-या नहरकत दाखला/ परवानगी देण्यापुर्वी अंमलात आणावयाच्या मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १ | पथदिव्यांसाठी व ग्राहकांच्या विजलाईन टाकण्यासाठी किमान ४ X ४.५ ( ११६ X१०० MM X ११ मीटर उंचीचा लोखंडी गर्डर पोल लावणे आवश्यक आहे. |
| २ | सदर पोलवरती ३ फेज ५ वायर (R,Y,B,N) अणि Street Light phase ) साठी योग्य त्या क्षमतेच्या ॲल्युमिनियम तारा ओढणे आवश्यक आहे. |
| ३ | दोन पोलमधील अंतर कमाल ३० मीटर पर्यंत असावे. |
| ४ | सदरील पोलवरती भविष्यात महावितरण/ग्राहक/विकसक यांना उच्चदाब (११ KV) वाहिनी ओढण्यासाठी सुविधा ठेवलेली असुन प्रत्यक्षात सदर उच्चदाब वाहिनीचे काम करण्याची आवश्यकता नाही |
| ५ | विकसकाचा प्लॉट १ एकर (२५००० स्के.फुट प्लॉट एरिया ) किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर किमान १०० KVA क्षमतेचा त्यापेक्षा जास्त क्षमतेचा रोहित्र महवितरणच्या परिपत्रक क्रमांक ED/{DIST-II} M-I/NSC-GUIDELINES- |

| | |
|---|---|
| | NO.३५५३०१४ Novembar २०२४ अन्वये उभारणी करणे हे विधुत विभागाच्या पाहणी व मार्गदर्शन पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे बंधनकारक राहिल. |
| ६ | सदरील पथदिव्यांसाठी ४० वॅट एल.ई.डी. फिटींग व गॅलव्हनाईज्ड पाईप (१ जाडीचा व १.५ मीटर लांबीचा) वारण्यात यावा. |
| ७ | विकसकंनी नकाशा मंजुरी घेतांना नकाशावरती सदरील पथदिव्यांचे रेखांकन करून घावे व रेखांकन करतांना पथदिव्यांचे पोल फुटपाथमध्ये येवु नये याची काळजी घ्यावी |
| ८ | पथदिव्यांचा कंट्रोलि स्विच हा प्लॉटीगमधील प्रथम पोलवरती घेणे आवश्यक आहे. |
| ९ | एल.ई.डी. पथदिवे फिटींग मधुन निघणारी वायर ही योग्य क्षेमतेची व ॲल्युमिनियमची असणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी कॉपर वायर वापरण्यात येवु नये कारण ॲल्युमिनियम तार व कॉपर वायर जोडल्यास कार्बन येतो |
| १० | वरील काम करतांना विधुत संच मांडणीचे सर्व विधुत साहित्य आय.एस.आय. मानंकनाचे असणे आवश्यक आहे. |
| ११ | पथदिव्याचा प्रत्येक पोल हा G.I आर्थिंग करण्यात यावे. |
| १२ | गार्डनिंग व लूप करणे तसेच आवश्यकते नूसार स्पेसर्स बसविणे पोलला स्टे ईन्स्युलेटर करणे व पोलला RCC कोपींग करणे आवश्यक आहे. |
| १३ | वरील सर्व बाबी व प्लॉटचे क्षेत्रफळानूसार कोणतेही बदल/काम, कामाचे स्वरूप हे मार्गदर्शन पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे करणे बंधनकारक राहिल. |

वरील सुचना अंमलबजावणी करणेस तसेच सार्वजनिक बाधंकाम विभाकडुन सन २०२३-२०२४ च्या मंजुर DSR दरा नुसार कार्यवाही करणेस तसेच सार्वजनिक बाधंकाम विभाकडुन DSR दरात काही बदल झाल्यास त्यानुसार निश्‍चित केलेल्या दरा नुसार कार्यवाही करणेस मा. सर्व साधरण सभा मंजुरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका